# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १२/७/२००६ रोजीची तहकूब व बुधवार दि.२६/७/२००६ रोजी संपन्न झ ालेल्या**

**स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त**

दि.१२/७/२००६ रोजी तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा, **बुधवार** दिनांक **२६ जुलै २००६** रोजी मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. सौ. दलाल लता श्रीनिवास
5. श्री. पांडे विनायक प्रभाकर
6. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
7. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
8. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
9. श्री. मो. जावेद मो. इसाक
10. हाजी शेरखान अ. रहेमान

**विषय क्र.48 :**

दिनांक 28-6-2006 (कार्यक्रम पत्रिका क्र.06) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. हिंमतराव दाभाडे : महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी श्री.महेन्द्र खैरनार यांचे दुःखद निधन झाले, त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

डॉ.आशा बिनवडे : मुख्य लेखाधिकारी श्री.महेंद्र खैरनार आपल्या सर्वांमधून निघून गेले. सर्वांना दुःख झाले. सभागृहातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.विनायक पांडे : आताच स.सदस्यांनी प्रस्तावित केले त्यास माझे अनुमोदन आहे. श्री.महेंद्र खैरनार हे एक चांगले अधिकारी होते. अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये नेहमी समन्वय ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. आजारपणाची लढाई ते हरले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

(महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी स्वर्गीय श्री.महेंद्र खैरनार यांना सभागृहात दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

श्री.हिंमतराव दाभाडे : वॉर्ड कार्यालय फ च्या अंतर्गत सुमारे 16 वॉर्ड येतात व साफसफाईसाठी ट्रक कमी आहेत. प्रत्येक वॉर्डासाठी कचरा वाहून नेण्याकरीता प्रत्येक दिवशी ट्रक उपलब्ध होत नाही त्यामुळे घाण साचून राहते. ट्रक वाढवण्यासाठी संपर्क केला, परंतु वाढवले नाही. जनतेची गैरसोय होते. 16 वॉर्डात किमान चार ट्रक असावेत. दररोज सफाई होऊन कचरा उचलला जाईल.

मा. सभापती : वाहनांची कमतरता आहे. माझे दौऱ्यातही ही बाब निदर्शनास आलेली आहे. जे ट्रक कमी पडतात ते पुरविण्यात यावेत.

सौ. लता दलाल : मागील इतिवृत्त कायम करण्यासाठी ठेवण्यात आलेले आहे. यात चर्चेच्या वेळी एका मुद्यासंदर्भात वृत्तपत्रात बातमी छापून आली, नगरसेवक झोपा काढतात. हा सभागृहाचा हक्कभंग आहे. धूर फवारणीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे की, कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. किती वॉर्डामध्ये धूर फवारणी झाली. जास्तीचे फॉगींग मशीन किती आले, किती टक्के डासांवर परिणाम झालेला आहे? खुलासा करण्यात यावा.

जीवशास्त्रज्ञ : मला स.सदस्यांच्या भावना दुखवायच्या नव्हत्या. सकाळी 5.30 वा. फवारणीचे काम सुरू केले जाते त्यावेळी स.सदस्य झोपेत असतील असे मी ओघात बोलले.

सौ. लता दलाल : नगरसेवक झोपेत असतात आम्ही उठवायला जायचे का, वृत्तपत्रात बातमी आलेली आहे, इतिवृत्तातही आलेले आहे.

मा. सभापती : आपणांस सविस्तर खुलासा करण्यासंबंधी सूचना करण्यात आल्या होत्या. सविस्तर खुलासा करावा. फवारणी संदर्भातही खुलासा करावा.

जीवशास्त्रज्ञ : नोव्हान या औषधाची फवारणी हाय रिस्क भागात करण्यात येते. अ वॉर्डात हर्षनगर, हिनानगर, हर्सूल, भिमनगर भावसिंगपुरा इत्यादी.

श्री.विनायक पांडे : व्हायरल इन्फेक्शनने मी गेल्या आठ दिवसांपासून आजारी आहे. फवारणीच्या संदर्भात कर्मचारी नगरसेवकांच्या घरी येतात व सह्या घेवून निघून जातात.

श्री. रविकांत गवळी : फॉगींग मशीन आले, माझ्या वॉर्डात 15 मिनिटांपेक्षा जास्त चालली नाही. माझ्या गल्लीच्या अवतीभवती धूर फवारणी करण्यात आली. मात्र वॉर्डात इतर ठिकाणी केली नाही.

डॉ.आशा बिनवडे : इतिवृत्तावर चर्चा होत आहे. शहरात चिकुन गुनियाची साथ आहे. रूग्णांची संख्या कमी नाही. चिकुन गुनिया डासांमुळे होतो, डासांची संख्या देखील कमी झालेली नाही. मागच्या सभेत चर्चा झाली होती. या कामाची जबाबदारी मलेरीया विभागावर आहे. मलेरीया विभाग ही जबाबदारी पार पाडतांना कुचकामी ठरलेला आहे. म्हणून रूग्ण कुठेही कमी झालेले नाही. मागे स.सदस्य सौ.लताताई दलाल यांनी संबंधीत अधिकाऱ्यांना प्रश्न विचारले की, कोणकोणत्या ठिकाणी पाहणी केली? स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी विचारणा केली, माझा वॉर्ड माहित आहे का? त्यावेळी जीवशास्त्रज्ञ यांनी मोठ्या आवाजात खुलासा केला. बायोलॉजीस्ट याचा अर्थ जीवशास्त्रज्ञ कसा होईल? शास्त्रज्ञ म्हणजे सायन्टीस्ट, लॉजीस्ट शब्दाचा अर्थ अभ्यास करणारा होतो. जीवशास्त्रज्ञ तज्ज्ञ असावे. स्वतःला जीवशास्त्रज्ञ म्हणवून घेतात. या संदर्भात अभ्यास केलेला आहे का? औषधी फवारणी किती प्रमाणात झाली, त्यामुळे प्रतिकारशक्ती कमी झाली का? डास निर्मुलन झाले आहे का, परिणामकारक औषधी फवारणी करण्या संदर्भात अभ्यास केलेला आहे का? गेल्या अनेक वर्षापासून कोणती औषधी फवारणी होते, जायमोक्यावर गेले असते तर कळाले असते. इतिवृत्तातील पान 8 वर उत्तरे दिलेली आहेत. त्यांना वाईट म्हणण्याचा उद्देश नाही. जी औषधी येते ती इफेक्टीव्ह आहे, नोव्हॉन 30 एमएल 10 लिटर पाण्यात टाकण्यात येते. धूर फवारणी साठी 4 लिटर डिझेल व 1 लिटर पेट्रोल टाकले जाते. एक तास मशीन चालते असे म्हटले. औषधी केंद्र शासनाकडून राज्य शासनामार्फत येतात. कधी कधी 10-20 एमएल औषधी वाढवून टाकली जाते. प्रत्यक्ष फवारणी केली तर त्या कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता 500 एमएल नोव्हान 5 दिवसांसाठी सकाळी व संध्याकाळी, एक वॉर्ड असे 10 वॉर्ड करायचे असतात. म्हणजे एका वार्डासाठी 50 एमएल नोव्हान दिले जाते. 10 लिटर पाण्यात 5 एमएल औषध टाकतात. नोव्हान हे शासनाकडून येत नाही. महानगरपालिका खरेदी करते. नोव्हानची गेल्या अनेक वर्षापासून खरेदी होते. त्याचा दर प्रति लिटर रू.370/- ते 400/- इतका आहे. स्वतःला जीवशास्त्रज्ञ म्हणवून घेतात, नोव्हान या औषधामुळे डास निर्मुलन होत नाही. नोव्हान हे सिनजेट कंपनीकडून खरेदी करतो. शेतीच्या वापरासाठी हे आहे. हे औषध डासांसाठी वापरले जाईल असे नमूद केलेले नाही. कोणत्या पिकावर व कोणत्या

किटकांवर परिणामकारक आहे हे त्यावर लिहिलेले आहे. 30 एमएल 10 लिटर पाण्यात असे प्रमाण लिहिलेले आहे. इतकी वर्षे का वापरले? किती जागरूकता आहे? शासनाचे निर्देश नाहीत. पायरेथरम, अबेट या दोन औषधी शासनाकडून पुरवठा होतो. वृत्तपत्रांना देखील विनंती करण्यात येते की, त्यांनी वृत्तपत्रातून संदेश द्यावा की, धूर फवारणी घराघरामधून करून घ्यावी. अबेट औषध हे जेथे पाणी साठवलेले आहे त्यावर टाकावे. हे औषध मनुष्यासाठी धोकादायक नाही. डासांचा, अळीचा प्रादुर्भाव कमी करता येईल. ज्यामुळे आजार होतो त्या मादी घरामध्ये राहतात. घरात फवारणी केली नाही, बाहेरच केली तर काही उपयोग नाही. ज्या सूचना केल्या त्याचा खुलासा करावा.

श्री. संजय शिरसाट : स.सदस्या डॉ.बिनवडे यांनी औषधांचे पृथःकरण करून चांगली माहिती सभागृहाला दिली. नोव्हॉन हे औषध कृषीसाठी वापरले जाते. आपण वर्षानुवर्षे खरेदी करतो. आपण किती वर्षापासून खरेदी करतो, यास जबाबदार कोण?

मा. सभापती : जीवशास्त्रज्ञ यांनी खुलासा करावा. खुलासा करताना चुकीची माहिती देऊ नये.

जीवशास्त्रज्ञ : 25 वर्षापासून नोव्हॉन ही औषध फवारणी होते. मला दोन वर्ष झाले. या संदर्भात तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी श्री.काळे साहेबांशी चर्चा झाली होती. नोव्हॉन हे औषध शासनाकडून मिळत नाही, आपण खरेदी करतो. श्री.काळे साहेबांनी म्हटले जुने औषध आहे बदलू नका.

सौ. लता दलाल : आता आपण तसे बोलले नाही असे सांगतात.

श्री. रविकांत गवळी : संबंधीत अधिकारी यांना दोन वर्ष झाले. मागील चुकीचा पायंडा चालू ठेवावा असे वाटले का? संबंधीत अधिकारी नागरीकांच्या जीवनाशी खेळत आहे.

सौ. लता दलाल : मा.आयुक्तांनी मागच्या वेळी म्हटले होते संपूर्ण देशात एकाच औषधीचा वापर होतो. या औषधामुळे इफेक्ट होत नाही असे लक्षात आल्यानंतर राज्य शासनामार्फत केंद्र शासनास कळवावयास पाहिजे. औषधी कोणती व किती प्रमाणात कशासाठी वापरतात हे अधिकाऱ्यांना माहित नाही तर या पदावर राहण्यास सक्षम आहेत का?

आरोग्य वैद्य.अधिकारी : अर्बन मलेरीया स्कीम असते त्यामध्ये प्रेव्हींग ही ॲक्टीव्हीटी नाहीत. डांसांची उत्पत्ती झाली नाही पाहिजे. माशासाठी वर्षानुवर्षे ही औषध फवारणी होते. ते बंद करू नये अशी सूचना तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी केली होती.

श्री. संजय शिरसाट : नोव्हॉन कशासाठी वापरतात?

आरोग्य वैद्य.अधिकारी : नोव्हॉन हे औषध आपण भांडारा मार्फत खरेदी करतो. माशांचा व किटकांचा नायनाट करण्यासाठी वापरले जाते, डास निर्मुलनासाठी नाही. माशा कमी करण्यासाठी वापरले जाते. मी जीवशास्त्रज्ञ यांना कल्पना दिली होती यामुळे डास मरत नाही. त्यांची विनंती होती की, बंद करू नये माशा मरतात.

सौ. लता दलाल : कुणालाही या बाबतीत गांभीर्य वाटत नाही. जे दोषी असतील त्यांचेवर कारवाई करावी.

मा. सभापती : प्रशासनाला स्पष्ट सूचना देण्यात येते की, संबंधीत अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी. धूर फवारणी नियमित व्हावी व या संदर्भात स.सदस्यांना माहिती होत नाही, माहिती देण्यात यावी. सभागृहात खोटी माहिती दिलेली आहे. फवारणीसाठी जे औषध आवश्यक आहे ते वापरावे. गांभीर्याने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. आजच माझ्या दालनामध्ये या संदर्भात चर्चा करण्यात यावी व यावर उपाययोजना करावी. फवारणी होत असताना नागरीकांना तसेच संबंधीत स.सदस्यांना माहिती द्यावी.

**ठराव :**

दिनांक 28-6-2006रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.49 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-2 परिसर सदाशिवनगर व रामनगर परिसरासाठी एन-5 जलकुंभ ते रामगिरी हॉटेल पर्यंत 400 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-9

जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.21,92,300/- (महानगरपालिकेमार्फत पाईपचा पुरवठा र.रू.17,68,125 + सी.आय.स्पेशल आणि लेबर कॉस्ट रू.4,24,175/- असे एकूण रू.21,92,300/- ) चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन 2005-06 अन्वये तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.163 अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार बी-1 निविदा मागविल्या असता विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण 2 निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याचे अंतिम तारखेला फक्त एक निविदा प्राप्त झाली, त्याचा दर खालील प्रमाणे आहे.

1. श्री.पी.पी.जोशी 14.77% जास्त दराने

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदेचा दर अं.प.दरापेक्षा 14.77% जास्त असल्या कारणाने **अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्यास मान्य अन्यथा फेर निविदा मागविणे योग्य** अशी मा.आयुक्तांची मंजुरी झाल्यानुसार श्री.पी.पी.जोशी यांना जा.क्र.मनपा/पापु-2/713/06, दि.26.4.2006 अन्वये पत्र देवून विचरणा केली असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यासाठी लेखी संमती दिली आहे.

तरी सदरील कामासाठी श्री.पी.पी.जोशी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.साहेबराव कावडे : यापुर्वीची कामे मंजुर झालेली आहेत, निविदा पण झाल्या. परंतु ठेकेदार व अधिकारी काम करीत नाही.

श्री. विनायक पांडे : जुन्या डीएसआर नुसार ठेकेदार काम करीत नाही, अनेक निविदा पडून आहेत.

कार्य.अभि.(पापु) : मागील वर्षी डीआयके-7 आणि डीआयके-9 पाईप खरेदी करण्यात आलेले आहे. 3 कोटीच्या निविदा होत्या. 95% पाईप आलेले आहेत. आधी जर निविदा काढल्या असत्या, पाइपचा पुरवठा आपणाकडून होणार आहे. त्यामुळे विलंब झाला. पाईपची किंमत सोडून दर वाढलेले आहेत. 10 ते 15% वाढून दर आले. पुन्हा निविदा काढली, निविदा विक्री झाली नाही. काही ठिकाणी विचारणा केली, अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहेत का? कार्यवाही चालू आहे. काही कामे एजन्सीने घेतली नाही त्या ठिकाणी दोन तीन दिवसामध्ये पूर्ण एकत्र निविदा काढल्या जातील. पाईपची किंमत वजा करून निविदा काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. साहेबराव कावडे : ठेकेदार काम करण्यास तयार आहे का?

श्री. रविकांत गवळी : मागील वर्षात पाणी पुरवठ्याची कामे झालेली नाहीत. काम करण्यास ठेकेदार तयार होत नाही. अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा 12 ते 15% जास्त दराने देखील काम करण्याची ठेकेदारांची इच्छा नाही.

श्री. संजय शिरसाट : एखादे काम 10 लाखाचे असेल तर 8 लाख पाईपची किंमत होते. ठेकेदाराला मात्र 10 लाखाचे 2% अनामत भरायला लावतात. डीएसआर हा नंतरचा भाग आहे. 2 लाखासाठी निविदा काढण्यात यावी. म्हणजे त्या रक्कमेच्या 2% अनामत भरणे ठेकेदारास सोयीचे होईल. पाईपची किंमत वगळून उर्वरीत बाबीसाठी निविदा काढण्यात यावी.

मा. सभापती : स.सदस्य श्री.संजय शिरसाट यांनी उपस्थित केलेला मुद्दा रास्त आहे. पाईपची किंमत वगळून निविदा काढण्यात यावी. सदर विषय मंजूर करण्यात येतो. त्वरीत काम सुरू करावे. नसता ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रीया सुरू करावी.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-2 परिसर सदाशिवनगर व रामनगर परिसरासाठी एन-5 जलकुंभ ते रामगिरी हॉटेल पर्यंत 400 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री.पी.पी.जोशी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.हिंमतराव दाभाडे : नवीन कामांची सुरूवात होत आहे. 2005 ची कामे मंजूर झालेली आहेत. माझ्या वॉर्डात ड्रेनेजची दोन कामे मंजूर झालेली आहेत. जे काम झालेले आहे त्यामध्ये वापरलेले व फुटलेले पाईप पुन्हा वापरण्यात आले. त्यामुळे दूषित पाणी आले तर यास जबाबदार कोण राहणार? अधिकाऱ्यांना अंदाजपत्रकीय दर विचारले तर बरोबर उत्तर देत नाहीत. काम कसे व्हायचे ते सदस्यांना कळायला मार्ग नाही. अंदाजपत्रकीय दराची प्रत सदस्यांना देण्यात यावी. कामाच्या संदर्भात स.सदस्यांनी तक्रार केली असेल तर संबंधीत ठेकेदारावर कारवाई व्हावी.

**विषय क्र.50 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) प्रस्ताव सादर करीत आहे की, कामगार चौक ते ठाकरेनगर महालक्ष्मी चौक एन-2 सिडको येथे 300 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.12,98,712/- (महानगरपालिकेमार्फत पाईपचा पुरवठा र.रू.10,74,883 + सी.आय.स्पेशल आणि लेबर कॉस्ट रू.2,23,829/- असे एकूण रू.12,98,712/- ) चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन 2005-06 अन्वये तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.101 अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार बी-1 निविदा मागविल्या असता विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण 4 निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याचे अंतिम तारखेला एकूण 2 निविदा प्राप्त झाल्या, त्याचा दराबाबत तपशील खालील प्रमाणे आहे.

1. श्री.एम.एस. भागवत — 4.99% जास्त दराने
2. श्री.स्वामी समर्थ कन्स्ट्रक्शन — 9% जास्त दराने

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा श्री.एम.एस. भागवत यांची असून अं.प.दरापेक्षा 4.99% जास्त दराने असल्या कारणाने **अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्यास मान्य अन्यथा फेर निविदा मागविणे योग्य** अशी मा.आयुक्तांची मंजुरी झाल्यानुसार श्री.एम.एस. भागवत यांना जा.क्र.मनपा/पापु-2/725/06, दि.08.05.2006 अन्वये पत्र देवून विचरणा केली असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यासाठी लेखी संमती दिली आहे.

तरी सदरील कामासाठी श्री.एम.एस. भागवत यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कामगार चौक ते ठाकरेनगर महालक्ष्मी चौक एन-2 सिडको येथे 300 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या कमी दराचे निविदाधारक श्री.एम.एस.भागवत यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.51 :**

कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा) प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-9 एच-सेक्टर या ठिकाणी 150, 250, 300 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.12,80,890/- (महानगरपालिकेमार्फत पाईपचा पुरवठा र.रू.9,55,153 + सी.आय.स्पेशल आणि लेबर कॉस्ट रू.3,25,725/- असे एकूण रू.12,80,890/- ) चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसुची सन 2005-06 अन्वये तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समिती ठराव क्र.135 अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार बी-1 निविदा मागविल्या असता विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याचे अंतिम तारखेला एक निविदा प्राप्त झाली, त्याचा दराबाबत तपशील खालील प्रमाणे आहे.

1. श्री.एस.बी.साधवानी — 12% जास्त दराने

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदापैकी कमी दराची निविदा श्री.एस.बी.साधवानी यांची असून अं.प.दरापेक्षा 4.99% जास्त दराने असल्या कारणाने **अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार असल्यास मान्य अन्यथा फेर निविदा मागविणे योग्य** अशी मा.आयुक्तांची मंजुरी झाल्यानुसार श्री.एस.बी.साधवानी यांना जा.क्र.मनपा/पापु-2/471/06, दि.21.03.2006 अन्वये पत्र देवून विचरणा केली असता त्यांनी सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यासाठी लेखी संमती दिली आहे.

तरी सदरील कामासाठी श्री.एस.बी.साधवानी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा स्विकृती बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-9 एच-सेक्टर या ठिकाणी 150, 250, 300 मी.मी. व्यासाची डी.आय.के.-9 जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक श्री.एस.बी.साधवानी यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.52 :**

कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो.गारखेडा येथील जयदुर्गा गृहनिर्माण संस्थेपासून विजयनगर मार्गे छत्रपतीनगर पर्यंत नवीन 200 मीमी व्यासाची एसडब्ल्यूजी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू.5,70,000/- आहे. या कामासाठी रितसर निविदा बोलावून अंदाजपत्रकीय दराने मे.मोना कन्स्ट्रक्शन यांना काम करणेसाठी दि.10-3-2006 रोजी कार्यादेश प्रदान करण्यात आला असून काम प्रगती पथावर आहे. परंतु प्रत्यक्ष स्थळावरील भौगोलिक स्थितीचा (उंचवटे व खोलगट भाग) या बाबी विचारात घेता सदरील जलनिःसारण वाहिनी मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा जास्त खोलवर टाकावी लागत आहे. तसेच काही भागात उतार कायम ठेवण्याकरीता कमी खोलवर टाकावी लागत असून कमी खोलवर टाकण्यात आलेल्या जलनिःसारण वाहिनीस काँक्रीट केसींग करावी लागत आहे. तसेच 2.0 मीटरपेक्षा जास्त खोलीचे मॅनहोल चेंबर बांधणे इत्यादी बाबी मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्यामुळे अतिरिक्त बाबी र.रू.2,37,040/- सह सुधारीत अंदाजपत्रक र.रू.8,78,100/- चे तयार करण्यात आले आहे. अंतर्गत वाढीव रक्कमेचे काम मंजूर निविदा दराने करण्यास संबंधीत कंत्राटदार यांनी सहमती दर्शविली आहे. सदरील कामाकरीता लागणारा वाढीव खर्च अर्थसंकल्प पुस्तिका पृष्ठ क्र.54 अ.क्र.6 अन्वये ब्लॉक बजेट रू.50.00 लक्ष मधून भागविण्याचे प्रस्तावित आहे. अतिरिक्त बाबीसह सुधारित अंदाजपत्रकास दि.9.6.2006 रोजी मा.आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त झाली आहे. तरी अतिरिक्त बाबी र.रू.2,37,040/- सह सुधारीत अंदाजपत्रकानुसार वाढीवकाम मे.मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून करण्यास मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : मुळ अंदाजपत्रक 5.70 लाखाचे आहे. प्रत्यक्ष काम करताना उंच भाग, खोलगट भाग, काही ठिकाणी जास्त खोलवर खोदकाम करावे लागते. सदर कामाचे अंदाजपत्रक कुणी तयार केले, जायमोक्यावर गेले नव्हते का? 2.37 लाखाचा फरक येतो. रस्त्याच्या कामाबाबतीत मला अनुभव आलेला आहे. अंदाजपत्रक बरोबर झालेले नाही.

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.) : जयदुर्गा सह.गृ.नि.संस्थेपासून विजयनगर मार्गे छत्रपती नगर 200 मीमी व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम असून त्यांच्या जागेतून ड्रेनेज लाईन शॉर्टकट करून कमी अंतराने टाकण्याचा प्रयत्न केला होता.

सौ. लता दलाल : रेखांकन कधी झालेले आहे? जुने अंदाजपत्रक आहे. ते केंव्हाचे आहे? स्थायी समितीने अंदाजपत्रकाला मंजुरी दिली का?

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.) : सदर प्रकरण 2003 पासून चालू आहे. 2003 पुर्वी रेखांकन मंजूर झालेले आहे. या भागात पोच रस्त्याची समस्या होती. त्यामुळे अंदाजपत्रक प्रलंबीत होते.

सौ. लता दलाल : पुर्वी प्रस्ताव दिला होता का?

श्री. संजय शिरसाट : स्थायी समितीपुढे यायची आवश्यकता नाही. स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवण्याचे निकष काय आहेत?

कार्य.अभि.(वि.ड्रे.इ.) : मा. आयुक्तांनी शिफारस केल्यामुळे पाठविण्यात आले.

मा. सभापती : विषय क्र.52 मंजूर करण्यात येतो. यापुढे अंदाजपत्रक तयार करताना काळजी घ्यावी. वाढीव अंदाजपत्रक होणार नाही याची देखील काळजी घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.गारखेडा येथील जयदुर्गा गृहनिर्माण संस्थेपासून विजयनगर मार्गे छत्रपतीनगर पर्यंत नवीन 200 मीमी व्यासाची एसडब्ल्यूजी ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामामध्ये झालेल्या

बदलानुसार अतिरिक्त बाबी र.रू.2,37,040/- सह सुधारीत अंदाजपत्रक र.रू.8,78,100/- चे वाढीव रक्कमेचे काम मंजूर निविदा दराने या कामाचे मुळ गुत्तेदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.53 :**

मा. आयुक्तांच्या मान्यतेनुसार प्रकल्प संचालक यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपाच्या दारिद्र्य निर्मूलन कक्षातर्फे 1990 पासून एक वर्ष कालावधीचे शासन मान्यता प्राप्त आय.टी.आय. दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण घेतलेल्या बऱ्याच महिला प्रथम श्रेणीत/द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होत असतात. सदर प्रशिक्षण केंद्र प्राधान्याने झोपडपट्ट्यांमध्ये एक अथवा दोन वर्षासाठी कार्यरत असतात. एका केंद्रामध्ये 20 महिलांना प्रवेश दिला जातो.

शासनाच्या तांत्रिक बोर्डाच्या सूचनेनुसार 2004 पासून नोंदणी शुल्क रू.110/- तसेच परिक्षा शुल्क रू.240/- अशी एकूण रू.350/- प्रत्येक वर्षी ऑगस्ट मध्ये शासनाकडे जमा करणे बंधनकारक केले आहे. तसेच महानगरपालिकेचे प्रवेश शुल्क रू.5/- व मासिक शुल्क रू.5/- असे वार्षिक रू.65/- सामाजिकदृष्ट्या कमकुवत घटकातील महिलांना जमा करावे लागते.

याद्वारे प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या "कमकुवत घटक कल्याण" या लेखा शिर्षाअंतर्गत खर्च करण्यात यावा. सदर निधी फक्त मागासवर्गीयांवर खर्च करता येतो. शासनाने शुल्क वाढविल्यामुळे गरीब महिला परिक्षेला बसण्यास धजावत नाही. या निधीतून मागासवर्गीय महिलांचे शासनाला प्रत्येक वर्षी प्रशिक्षणार्थी प्रदान करावयाचे शुल्क रू.350/- अदा करण्यात यावे. यामुळे दरवर्षी या निधीतून रू.21,000/- खर्च येईल. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.हिंमतराव दाभाडे | : दारिद्र्य निर्मुलन कक्षा संदर्भात पाठीमागचा अनुभव प्रशिक्षणासाठी झोपडपट्टी विभागातून महिला येतात. कागदपत्रे व्यवस्थीत नाही, उडवाउडवीची उत्तरे देतात व त्यामुळे ते प्रशिक्षणापासून वंचित राहतात. सोयीनुसार कामे केली जातात. याची चौकशी झाली पाहिजे. |
| प्र.प्रकल्प संचालक | : 1985 ते 90 महानगरपालिकेतर्फे प्रशिक्षण देण्यात येते. 1990 पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला जोडण्यात आलेले आहे. यावर्षी रमानगर, कबीरनगर, मसनतपूर या स्लम भागात सुरू केले. एक वर्षाचा कालावधी असतो. शिवण कामाचे प्रशिक्षण दिले जाते. एका केंद्रात 20 महिलांना प्रशिक्षण, सर्व समाजाच्या, 7वी पास असणे आवश्यक आहे. शाळा सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| सौ. लता दलाल | : केव्हापासून सुरू आहेत? सन 2000 ते 2006 पर्यंतची माहिती पुढच्या सभेत देण्यात यावी. कमकुवत घटकासाठी सर्व वॉर्डामध्ये ही योजना राबवावी. |
| श्री.साहेबराव कावडे | : सर्व वॉर्डासाठी लागू करता येईल का? |
| मा. सभापती | : स.सदस्य सौ.लता दलाल यांनी केलेल्या सूचनांचे अधीन राहून विषय क्र.53 मंजूर करण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या "कमकुवत घटक कल्याण" या लेखा शिर्षाअंतर्गत खर्च करण्या या निधीतून मागासवर्गीय महिलांचे शासनाला प्रत्येक वर्षी प्रशिक्षणार्थी प्रदान करावयाचे शुल्क रू.350/- अदा करण्यास तसेच या निधीतून रू.21,000/- च्या होणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.54 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील मंजूर रेखंकनातील एकूण 51 जागांवर 5000 वृक्ष लागवड करणे, त्याचे तीन वर्षाकरिता वृक्ष संवर्धन व देखभालीची कामे करणे तसेच रिकाम्या जागेची स्वच्छता ठेवणे इत्यादी करीता रू.14,34,474/- चे अंदाजपत्रक तयार केले असून त्यासाठी खालील अटी-शर्ती आहेत.

1. कमीत कमी 5 ते 6 फुट उंचीची झाडे लावावी व झाडांना पाणी देणे व झाडे तीन वर्ष सांभाळणे.
2. जागेची साफसफाई कायम स्वरूपी ठेवणे.

3. जिवंत झाडांची टक्केवारी नुसार देयक देणे.
4. देयक वर्षातून तीन वेळेस म्हणजे प्रत्येक चार महिन्याच्या नंतर देण्यात येईल.
5. झाडांची उंची व त्याचा व्यास (डायमीटर) वरून 3 वर्षानंतर अंतिम देयक देण्यात येईल. यासाठी तीन वर्षात खालील प्रमाणे प्रति वर्षी खर्च येणार आहे.

| | |
|---|---|
| 1. प्रथम वर्ष 40% नुसार | रूपये 5,73,790/- |
| 2. द्वितीय वर्ष 30% नुसार | रूपये 4,30,342/- |
| 3. तृतीय वर्ष 30% नुसार | रूपये 4,30,342/- |
| | **रू. 14,34,474/-** |

सदरील कामाकरीता निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/14/06 दि.29-5-2006 अन्वये निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 1. श्री.जाहीद बेग हैदर बेग मिर्झा | 2.10% जास्त दराने |
| 2. श्री. एस.एम. शेख | 3.25% जास्त दराने |
| 3. श्री. एकनाथ भाले | 4.99% जास्त दराने |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.जाहेद बेग हैदर बेग मिर्झा यांची आहे. श्री.जाहेद बेग हैदर बेग मिर्झा यांना वाटाघाटीसाठी बोलावले असता सदर ठेकेदारानी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे काम करण्यास संमती दिली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : 3 वर्षात काय करणार? शहर अभियंता यांनी श्री.भडके साहेबांची नियुक्ती केलेली आहे.

शहर अभियंता : 51 खुल्या जागा आहेत त्यास कुंपण भिंत बांधलेली असून त्या ठिकाणी 5000 मोठी झाडे 5 ते 6 फुट उंचीची लावण्यासाठी निविदा काढलेली आहे. यात झाडांची निगा ठेवणे, जागांची सफाई करणे, पाण्याचा अंतर्भाव नाही. शक्य असेल तेथे मनपाने पाणी द्यावे व त्याची वसुली करावी. तीन वर्ष झाडे जगवावे व नंतर अंतिम देयक देण्यात येईल.

मा. सभापती : 51 खुल्या जागांची माहिती देण्यात यावी. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील मंजूर रेखंकनातील एकूण 51 जागांवर 5000 वृक्ष लागवड करणे, त्याचे तीन वर्षाकरिता वृक्ष संवर्धन व देखभालीची कामे करणे तसेच रिकाम्या जागेची स्वच्छता ठेवणे इत्यादी करीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.जाहेर बेग हैदर बेग मिर्झा यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (07)**

## तहकूब सभेची सूचना

**दिनांक :- 22/07/2006**

दि. 12/7/2006 रोजी तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **बुधवार दिनांक 26 जुलै 2006 रोजी सकाळी 11.30 वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात आलेली असून या सभेची कार्यक्रम पत्रिका (का.प.क्र.7) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. करीता या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद